
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

2350-0476 (Online)
2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205
February 2025



A Peer Reviewed, Open Access Journal



Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

www.ijmmsind.com | Email : ijmms14@gmail.com

Volume I

INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Editors: Dr. V.H. Mane, Prof. M. P. Shaikh

Language: Multilingual

Published by
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Sneh Apartment,
Flat No. 001, Samarth Nagar, New Sangvi,
Pune- 411027

Copyrights: Editors 2014

All rights reserved

ISSN: 2394-207X (Print)

IMPACT FACTOR: 4.205

VOLUME-XII, ISSUE-II

February-2025

127.	Food access and equity: an examination of the relationship between food insecurity and socioeconomic disparities	Asst.Prof.-Yogita Balasaheb Divekar	949-951
128.	Transition metal oxides and their composites for photocatalytic degradation of organic pollutants: mechanism and environmental impacts.	Ganesh Nimbalkar[1], Dr. Dnyaneshwar Shinde[2], Dr. Yogesh Indulkar[3]	952-958
129.	A comparative analysis of sorting algorithms across programming languages : C & C++	Asst. Prof. Gote Komal Anil	959-964
130.	Sustainable development in education and its connection to teaching english as a second language	Dr. Mahsa Moshfegyan	965-969
131.	NGT's Impact on Sustainable Development and Biodiversity Protection	Dr. Mali B. B.	970-978
132.	The significance of corporate social responsibility for organizations and employees	Mr. Amol Salunkhe Ms. Priyanka M. Deshmukh	979-989
133.	Unlocking a sustainable future: the importance of a green economy in addressing climate change	Mr.Sachin Narsingrao Pawar	990-996
134.	Soybean cultivation and its contributions to the indian economy	Mayur Laxman Ghadge Dr. R. S. Desai (Mavchi)	997-1001
135.	Smart waste management: leveraging ai for environmental sustainability	Mr. Gadhave Ajay Mahadeo, Mrs. Jagtap Varsharani Samir	1002-1010
136.	पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक धोरणांच्या परिणामकारकतेचा अभ्यास २०१३-१४ ते २०१७-१८	सौ.अमृता संदीप घोणे डॉ. श्री. किशोर शंकर निकम	1011-1018
137.	स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांचे कार्य आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वृत्तपत्रीय लेखन	प्रा. ज्ञानेश्वर चंद्रकांत गुळीग प्रा. डॉ.राम निवृत्ती मोरे	1019-1025
138.	शाश्वत विकासामध्ये, आधुनिकिकरणाच्या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक वारसा जतन, वर्तणुक बदल आणि टिकाऊपणासाठी सामाजिक संक्रमण	सारिका विजय जगताप प्रा.डॉ. बाळू वामन गव्हाळे	1026-1029

VOLUME-XII, ISSUE-II ISSN (Online): 2350-0476 ISSN (Print): 2394-207X
IMPACT FACTOR: 4.205
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

शाश्वत विकासामध्ये, आधुनिकिकरणाच्या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक वारसा जतन, वर्तणुक बदल आणि टिकाऊपणासाठी सामाजिक संक्रमण

सारिका विजय जगताप
(संशोधक विद्यार्थिनी), अण्णासाहेब मगर कॉलेज हडपसर, पुणे – ४११ ०२७
प्रा.डॉ. बाळू वामन गव्हाळे
(मार्गदर्शक), बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव

गोषवारा – *भारत हा कृषी प्रधान देश असून भारतात आणि महाराष्ट्रात ७०/८० टक्के शेतकरी शेती व्यवसायावर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील लोकांची पोट भरायचे साधन म्हणजे शेती आहे. महाराष्ट्रात सुमारे ७२ ते ७० लाख शेतकरी वर्ग आहे कि त्यांच्याकडे फक्त अडीच एकर पेक्षा कमी म्हणजे एक हेक्टर एवढी शेतजमीन आहे. आणि ४० ते ४५ लाख शेतकरी कुटुंबाला एक ते दोन हेक्टर इतके शेतजमीन आहे आणि दोन ते चार हेक्टर एवढे क्षेत्र असणार फार कमी म्हणजे एक १७ ते १८ लाख शेतकरी महाराष्ट्रात आहे.*

महाराष्ट्रातील बरेच शेतीक्षेत्र निसर्गावर म्हणजे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे खात्रीशीर उत्पन्न घेण्यासाठी शेतक-याकडे कोणती शाश्वती नसते. मर्यादित जमीन क्षेत्र उत्पन्न असल्याने आणि सिंचन सुविधा आवश्यक तेवढ्या उपलब्ध नसल्यामुळे क्षेत्रात अधिक उत्पन्न कसे घ्यायचे याचा विचार करणे गरजेचे आहे.

प्रस्तावना :- शेती हा व्यवसाय भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती व्यवसायाच्या प्रगतीवरच देशाची एकूण आर्थिक प्रगती अवलंबून असते. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीला विशेष महत्व आहे.

आधुनिक शेतीचे उत्पन्न हे शेतीला आवश्यक असणा-या मशागत विविध गोष्टीचा योग्य प्रमाणात वापर करावा लागतो आणि आधुनिक शेतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी सिंचन व्यवस्था हे मुख्य भांडवल आहे. यामुळे पेरणी सुधारते, बियाणे, खते, पीक, कीटकनाशके कृषी तज्ञ संशोधकांनी अभ्यास करुन आणि विशेष कष्ट उपलब्ध करून दिले आहे. खत खताचे प्रमाण, पेरणीची पद्धत, बियाण्याची पद्धत, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, सिंचन पद्धत पाणी व्यवस्थापनाचा वापर करुन महाराष्ट्रातील शेतकरी कमी जागेत जास्त उत्पन्न घेण्याचा प्रयत्न शेतकरी करत आहे. त्याच बरोबर नाव नवीन आधुनिक शेती आधुनिकीकरण कडे चालले आहे.

सन १९८७ मध्ये पर्यावरण व विकास यावरील जागतिक समितीने ब्रुटलॅंड समितीने प्रथम शाश्वत विकास चिरकाल टिकणारा विकास ही संकल्पना वापरली.

शाश्वत विकासाचा अर्थ – शाश्वत विकासाच्या संकल्पनेला व्यापक खोली आहे. सध्या तिचा विस्तार राजकीय पक्षाचा राजकीय कार्यक्रम व निवडणुक मोहिम यांच्यापर्यंत झाला आहे. भविष्यकालीन विकासाच्या गरजेच्या संबंधीचा सध्याचा विकास मानला जातो. ही संकल्पना पर्यावरण अर्थशास्त्रात अत्यंत महत्वाचे आहे.

ब्रुटलॅंड अहवाल – जो भविष्यकालीन पिढीच्या त्यांच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या सामर्थ्याने तडजोडीशिवाय सध्याच्या गरजांची पूर्तता करणे होय. यालाच शाश्वत विकास म्हणतात.

रॉबर्ट ॲलन – मानवी गरजांचे चिरकाल टिकणारे साधन व मानवी जीवनाच्या दर्जात सुधारणा साध्य करणे म्हणजे शाश्वत विकास होय.

शेतीचे आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख

- कमीत कमी श्रमात जास्तीत जास्त उत्पादन
- कमी कालावधीत येणारे पिके लागवडं तंत्र
- हंगामनिहाय पीक लागवडीचे सुत्र व वापर
- शेतीविषयी अद्ययावत व उपयुक्त माहिती ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध
- रासायनिक खते व अन्नद्रव्ये व्यवस्थापन
- पीक संरक्षणासाठी रासायनिक, जैविक व नैसर्गिक तत्वांचा अवलंब
- मुख्य पिकाचे काढणी पश्चात नवनवीन तंत्रज्ञान
- मानवी आरोग्यासाठी सेंद्रिय उत्पादने
- शेतीपूरक उद्योग व व्यवसाय करण्यासाठी भागभांडवलाची उपलब्धता
- शेतकरी कामगार व उद्योजकता यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कल्याणकारी विशेष कृषी योजना
- शेतीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कल्याणकारी कृषी योजना
- कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत शेतक-यांना विविध सवलती

शाश्वत विकास आणि संयुक्त राष्ट्रसंघ –

साधारण: १९३ सदस्य राष्ट्रांचा संघ म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्रसंघ जागतिक प्रश्नांच्या अनुषंगाने आणि जागतिक शांततेच्या दृष्टिने सातत्याने कार्य करतो. अणुबॉम्बच्या निर्मितीने पृथ्वीतलावाच्या मानवी अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे जागतिक शांततेच्या आवश्यकतेतून संयुक्त राष्ट्र संघाची निर्मिती झाली. अगदी त्याचप्रमाणे विकास विकास आणि विकास यांच्या जागतिक चढाओढीतून नैसर्गिक साधन संपत्तीचा वारेमाप उपभोग व अपव्यय यातून पर्यावरणीय असंतुलनाचा मोठा प्रश्न निर्माण होवून पृथ्वी तलावरील मानवी अस्तित्वाचे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे या अनुषंगाने संयुक्त राष्ट्र संघाच्या भूमिकेला महत्व प्राप्त होते.

१९९२ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण आणि विकास परिषदेच्या पहिल्या परिषदेत पर्यावरण आणि विकासाची पहिली रुपरेषा तयार केली. Agenda 21 म्हणून ओळखली जाते.

१९९२ ते २०१२ या वीस वर्षाच्या पर्यावरण आणि विकास आढावा संयुक्त राष्ट्र संघाच्या २०१२ च्या परिषदेत घ्यायचा ठरविल्या गेले. पुढे सप्टेंबर मध्ये एनजीओ ६४ च्या परिषदेत शाश्वत विकास उद्दिष्टे तयार करण्याची कोलंबिया प्रस्तावित कल्पना स्विकारल्या गेल्या व ते कसे साध्य करावयाचे ते निश्चित करण्यात आले.

शाश्वत विकास व राजकीय सत्ता –

राजकीय सत्ता यात जागतिक पातळीपासून ते अगदी गावपातळी म्हणजे अगदी राष्ट्र सरकार ते ग्रामपंचायतीपर्यंत यांचा विकासाशी संबंध असतो. राजकीय सत्तांनी आपल्या कार्यक्षेत्रात कार्य करत असताना शाश्वत विकासाच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने कायदे नियम व आचारसंहिता तयार केली पाहिजे. हवा, पाणी व स्वच्छतेला प्राधान्य देण्याबरोबरच नैसर्गिक साधन

संपत्तीचे संवर्धन व जतन करण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्नशील असले पाहिजे. परंतू आज संपूर्ण जगाचा विचार करता बहुसंख्य राजकीय सत्ता लोकशाही पद्धतीने असले पाहिजे. परंतू आज संपूर्ण जगाचा विचार करता बहुसंख्य राजकीय सत्ता लोकशाही पद्धतीने निवडल्या जातात. त्यामुळे राजकीय सत्ताचा कल हा लोकप्रिय निर्णयाच्या बाजूने जातो.

शाश्वत विकास आणि आर्थिक संस्था –

यात विविध प्रकारचे वस्तू व सेवांचे उत्पादन करणा-या जागतिक पातळीपासून ते अगदी कृषी उत्पादन करणा-या गावपातळी पर्यंतच्या संस्थांचा समावेश होत असला तरी यात महत्वपूर्ण भूमिका जागतिक स्तरावरील जागतिक बँक, आंतरराष्ट्र नाणेनिधी. प्रत्येक देशाच्या मध्यवर्ती बँका व इतर बँकांची भूमिका महत्वपूर्ण ठरते. आर्थिक संस्थांचा मुख्य उद्देश हा नफा कमावणे हा न ठेवता नफा यासोबतच शाश्वत विकासाच्या दृष्टीने ध्येय धोरणे ठरवून त्याचप्रमाणे कायदे नियम व अटी लादून शाश्वत विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

शाश्वत विकास आणि सामाजिक संस्था –

राष्ट्रिय स्तरावर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रकारच्या सामाजिक संस्था मोठ्या संख्येने कार्यरत आहेत. सामाजिक संस्थाचा मुख्य हेतू हा सामाजिक कल्याण हा आहे. सामाजिक संस्थांनी समाजाचे कल्याण कशात आहे हे जाणुन समाजाला संबोधीत करुन त्यांना तशी कृती करण्यास भाग पाडले पाहिजे. विकासाच्या प्रक्रियेत आर्थिक प्रकल्पाचे कल्याणाच्या दृष्टीने सामाजिक संस्थांना मूल्यांकन करता आले पाहिजे व मुल्यांकन करण्याचे अधिकार दिले गेले पाहिजे. घटकांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. जबाबदारीच्या दृष्टीने घटकांचा निर्देश दिले पाहिजेत.

शाश्वत विकास आणि मानवी आचरण –

प्रत्येक व्यक्तीला या भुसृष्टीबद्दल प्रेम असले पाहिजे. मानव जाती बद्दल प्रेम असले पाहिजे, जलद आर्थिक विकासाचा हव्यास व चंगळवादी भौतिक जीवनामुळे मानव खूपच हावरट, आळशी व संवेदनशील झाला आहे. प्रत्येकाला काळजी फक्त स्वत:ची आहे. प्रत्येक गोष्ट मला मिळाली आहे. प्रत्येक गोष्टींवर बाबींवर माझी हक्क आहे. राष्ट्र, देश, गाव, समाज, कुटुंब याच मला काही देण-घेण नाही. अशा वृत्तीत वावरत आहे. त्यातून निसर्गाकडून खूप काही आवश्यकतेपेक्षाही अधिक घेत आहे. परंतू त्याबद्दल निसर्गाला काही देत नाही. अन्नसाखळी बिघडत चालली आहे. पर्यावरण वाचविण्याची गरज आहे. निसर्गाकडून घेतलेले निसर्गाला परत करणे आवश्यक आहे. एक झाड तोडले तरी दुसरे झाड लावण्याची जबाबदारी आपलीच आहे.

शाश्वत विकास आणि धार्मिक संस्था –

सर्वच देशात अगदी राष्ट्रीय स्तरापासून ते अगदी गाव स्तरापर्यंत विविध प्रकारच्या धार्मिक संस्था अगदी पूर्वीपासुन अस्तित्वात आहे. आज विज्ञान युगातही धार्मिक संस्था आपले अस्तित्व टिकवून आहेतच शिवाय मोठ्या प्रमाणावर प्रभावी आहेत. आजही देवाला धर्माला मानतात. पाप-पुण्याच्या गोष्टी करतात. त्यामुळे या धार्मिक संस्थांनी शाश्वत विकासाची संकल्पना समजून घेवून लोकांना शाश्वत विकासासंबंधी प्रबोधित करण्यासाठी प्रभावी ठरु शकतात.

सारांश :-जलद विकासाच्या हव्यासापोटी जागतिक स्तरापासून ते अगदी गाव पातळीपर्यंत सर्व घटकांनी नैसर्गिक साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय केला. यात भावी पिढीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण तर झालाच शिवाय वर्तमान कालीन सुद्धा स्वच्छ पिण्याचे पाणी, हवा, प्रदूषण, जमिन प्रदूषण यासारखे यक्ष प्रश्न निर्माण झाले.

संदर्भ –

१) भारतीय अर्थव्यवस्था – भालेराव व देसाई
२) भारतीय अर्थव्यवस्था – प्रा.डॉ. ए.जी. मगदुम
३) Ksagarowon.in/2020
४) पर्यावरण प्रदूषण – कुमार प्रदिप
५) पर्यावरण अध्ययन – कुमार अमित
६) पर्यावरण शिक्षा – बा.ना. विना व ब.ना. राजू
७) शाश्वत विकास – दत्ता वानखेडे